

मुंबई : मेट्रो-३च्या रूळ बांधणीचे काम प्रगतिपथावर असून १४ टक्के काम पूर्ण झाले आहे. मेट्रो-३ रूळांमध्ये कंपने रोखणाऱ्या अद्ययावत प्रणालीचा वापर होत आहे. भारतात प्रथमच या प्रणालीचा वापर होत आहे. ध्वनी व कंपनांसंबंधी समस्यां संदर्भात अमेरिकन मानकाप्रमाणे हे तंत्रज्ञान उपयोगात येणार आहे.

# मेट्रो-३ रुळांत कंपने रोखणाऱ्या प्रणालीचा वापर

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

कुलाबा वांद्रे सीप्झ मेट्रो-३च्या रूळ बांधणीचे काम प्रगतीपथावर असून आतापर्यंत १४% काम पूर्ण झाले आहे. मेट्रो-३ रुळांमध्ये कंपने रोखणाऱ्या अद्ययावत प्रणालीचा वापर होत आहे. भारतात प्रथमच या प्रणालीचा वापर होत आहे. मेट्रो-३ प्रकल्पाचे एकंदरीत काम ७० टक्के काम पूर्ण झाले आहे. ८२ टक्के स्थापत्य कामे पूर्ण झाली आहेत. प्रणालीविषयक कामे ३४ टक्के तर, स्थानकांची ७६ टक्के कामे पूर्ण झाली आहेत.

प्रकल्पाचे एकूण ९७ टक्के भुयारीकरण पूर्ण झाले आहे. भुयारीकरणाचे उर्वरित काम पॅकेज-३ अंतर्गत महालक्ष्मी ते मुंबई सेंट्रल दरम्यान (२ किमी अंतर) सुरू आहे. आतापर्यंत मेट्रो-३ च्या स्थानकांच्या बांधणीचे जवळपास ७६ टक्के काम पूर्ण झाले आहे. स्टेशन बॉक्सच्या कॉंक्रीटिंगसह काही स्थानकांच्या पुनर्भरणाचे काम सुरू आहे.

एम. आय. डी. सी., सीप्झ, विधान भवन, मरोळ नाका, कफ परेड, सिद्धिविनायक, चर्चगेट, हुतात्मा चौक, मुंबई सेंट्रल आणि आंतरराष्ट्रीय विमानतळ या स्थानकांचे ८० टक्क्यांहून अधिक काम पूर्ण झाले आहे. ९ स्थानकांचे तिन्ही स्लॅबचे बेस स्लॅब, कॉंक्रीट स्लॅब १०० टक्के पूर्ण झाले आहे.